Impact Factor - 6.261

ISSN - 2348-7143



INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January - 2019

SPECIAL ISSUE- 85 (B)

# NATIONAL INTEGRITY & SARDAR VALLABHBHAI PATEL

**Guest Editor :**
Dr. B. S. Yadav
Principal,
K.J. Somaiya College of Arts,
Commerce & Science, Kopargaon
Dist. Ahmednagar [M.S.] INDIA

**Executive Editor of the issue :**
Dr. K. L. Giramkar
Dept. of History
K.J. Somaiya College of Arts,
Commerce & Science, Kopargaon
Dist. Ahmednagar [M.S.] INDIA

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

This Journal is indexed in :

- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

January-2019 Special Issue – 85(B)

## SARDAR VALLABHBHAI PATEL & NATIONAL INTEGRITY

**Guest Editor**
Dr. B. S. Yadav
K.J. Somaiya College, Kopargaon
Tal. Kopargaon, Dist. – Ahmednagar

**Executive Editor of the issue:**
Dr. K.L. Giramkar
Head. Dept. of History,
K.J. Somaiya College, Kopargaon
Tal. Kopargaon, Dist. – Ahmednagar

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 700/-

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 85 (B) : Sardar Vallabhbhai Patel & National Integrity
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | सरदार वल्लभभाई पटेल यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान | डॉ. आर.व्ही.ढेरे | 05 |
| 2 | हैद्राबाद संस्थानाचे विलीनीकरण व सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | डॉ. के.एस. बन | 08 |
| 3 | सरदार वल्लभभाई पटेल-एक लोहपुरुष | प्रा. डी. झेड. सावळे | 11 |
| 4 | सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नागपुर व बोरसद सत्याग्रहांचा अभ्यास | प्रा.विलास पवार | 14 |
| 5 | सरदार वल्लभभाई पटेल : नोकरशाही व प्रशासक विषयक विचार | डॉ. सुरेखा भिंगारदिवे | 17 |
| 6 | संस्थानाचे विलीनीकरण व सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | प्रा. अर्चना बच्छाव | 19 |
| 7 | बागलानातील सारा वाढविरोधी चळवळीला प्रेरक दीपस्तंभ सरदार वल्लभभाई पटेल | प्रा. संदीप भामरे | 23 |
| 8 | सरदार वल्लभभाई पटेल आणि 1928 चा बार्डोली सत्याग्रह | प्रा. गणेश विधाटे | 26 |
| 9 | लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल | प्रा. मधुकर साठे | 32 |
| 10 | हैद्राबाद संस्थान विलीनीकरनात सरदार पटेलांची भूमिका | प्रा. जे.एल. जायेवर | 38 |
| 11 | संस्थानांचे विलीनीकरण आणि सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | प्रा. राजेंद्र काळे | 41 |
| 12 | हैद्राबाद संस्थान विलीनीकरणात सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | प्रा. विकास टकले | 45 |
| 13 | वल्लभभाई पटेल एक आदर्श स्वातंत्र्य-सेनानी | डॉ.सय्यद मुजीबमुसा | 48 |
| 14 | कुशल प्रशासक सरदार पटेल | प्रा. शितल धरम | 51 |
| 15 | सरदार वल्लभभाई पटेल आणि महात्मा गांधी | प्रा.एच.एल.पंडूरे | 53 |
| 16 | सरदार वल्लभभाई पटेल आणि अखंड भारत | डॉ. बाळासाहेब कर्पे | 56 |
| 17 | सरदार वल्लभभाई पटेल व भारतीय संस्थाने | प्रा. अशोक बीडगर | 60 |
| 18 | सरदार वल्लभभाई पटेल आणि झेंडा सत्याग्रह | प्रा. अमोल बोत्रे | 65 |
| 19 | संस्थानाचे विलीनीकरणात सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | डॉ. संतोष पहारे | 67 |
| 20 | सरदार वल्लभभाई पटेल एक लोहपुरुष | डॉ. बी. डी. गव्हाणे | 72 |
| 21 | सरदार वल्लभभाई पटेल व स्वतंत्र भारतातील नोकरशाही सहसंबंध | प्रा. एस.व्ही. निळे | 75 |
| 22 | सरदार वल्लभभाई पटेल आणि पंडित नेहरू यांचे संस्थाने विलीनीकरणातील योगदान | डॉ. मनिषा जगदाळे (कुरुमकर) | 78 |
| 23 | संस्थानाचे विलीनीकरण व सरदार वल्लभभाई पटेल यांचे कार्य | डॉ. रघुराज कुरुमकर | 81 |
| 24 | सरदार वल्लभभाई पटेल आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळ | डॉ. लक्ष्मीकांत जिरेवाड | 85 |
| 25 | संस्थानांचे विलीनीकरण आणि सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | प्रा.लहू काकडे | 88 |
| 26 | सरदार वल्लभभाई पटेल यांची राजकीय विचारप्रणाली | प्रा. अनिल मते | 92 |
| 27 | सरदार वल्लभभाई पटेल आणि संस्थानांचे विलीनीकरण | प्रा.ज्ञानेश्वर पादर | 94 |
| 28 | सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवन कार्याचा अभ्यास | प्रा.गोरख रूपनवर | 97 |
| 29 | राष्ट्रीय एकीकरणाचे जनक सरदार वल्लभभाई पटेल | प्रा. संदीप शिरसाठ | 100 |
| 30 | देशी राज्याच्या एकीकरणात सरदार वल्लभभाई पटेल यांचे योगदान | डॉ. रघुनाथ शेळके | 104 |
| 31 | जागृती आणि सरदार वल्लभभाई पटेल | प्रा. सचिन मोरे | 109 |
| 32 | सरदार पटेल यांचे अहमदनगर किल्ल्यातील वास्तव्य | डॉ.एस.आर.पगारे, प्रा.डी.पी.बागूल | 113 |
| 33 | संस्थानाचे विलीनीकरणात सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | प्रा.एन.पी.सदाफळ | 116 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary ... ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013) January-201...
Special Issue 85 (B) : Sardar Vallabhbhai Patel & National Integrity
UGC Approved Journal

# सरदार वल्लभभाई पटेल आणि संस्थानाचे विलिनीकरण

प्रा. ज्ञानेश्वर बाळासाहेब पादर
सहा. प्राध्यापक
कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय सोनई,
ता. नेवासा जि. अहमदनगर
मो. ९९६०९५०२३६
Email- dnypadar@rediffmail.com

**प्रस्तावना :–**

इ.स. १७५७ च्या प्लासीच्या लढाईने इंग्रजांची मुळे भारतात रोवली गेली. त्यांचा विस्तार नंतरच्या काळात संपुर्ण भारतभर झाला. अशा प्रकारे भक्कम पकड त्यांनी भारतभर निर्माण केली. इंग्रजांची राजवट भारतीयांना नको होती. यातुनच उदय झाला तो राष्ट्वादाचा भारतीय भूमी स्वतंत्र असावी अशी भावना निर्माण झाली. आणि त्यासाठी सुरवात झाली ती इंग्रजांना भारतातून हाकलण्याची. भारतीय स्वातंत्र्यांची चळवळ भारताला स्वांतत्र मिळविण्यासाठी अनेकांनी, लहान थोरांनी, क्रांतीकारकांनी, स्त्रियांनी हर एक जाती धर्माच्या लोकांनी प्रयत्न केले. त्यामध्ये महत्वाची भुमिका बजावली ती म्हणजे राष्ट्रीय सभेने राष्ट्रीय सभेच्या नेत्यांनी त्यामध्ये महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, फिरोजशहा मेहता, दादाभाई नौरोजी, सरदार वल्लभभाई पटेल अशी अनेक नावे आहेत.

१९४७ ला भारत स्वांतत्र झाला खरा परंतू धुर्त इंग्रज जाता जाता व्देषाची फुटीरवादी धोरणाची बिजे भारतात रोवून गेली. ती म्हणजे संस्थानांना भारतात, पाकीस्तानात जाण्याची सवलत व स्वंतत्र राहण्याची सवलत देवून त्यांच्या या धोरणाचा परिपाक म्हणजे जूनागड, हैदराबाद व जम्मू काश्मिर संस्थानाने स्वंतत्र राहण्याची घेतलेली भुमिका. अशा परिस्थितीत स्वतंत्र भारताची एकसंधता टिकविण्याची जबाबदारी आली ती म्हणजे वल्लभभाई पटेलावर. संस्थाने भारतात विलीन करून त्यांनी यशस्वीपणे निभावली.

**उद्देश :–**

१. सरदार वल्लभभाई पटेलांच्या कामगिरीचा अभ्यास करणे.
२. सरदार वल्लभभाई पटेल व राष्ट्रीय सभेच्या स्वातंत्र्यत्तोर कामगिरीचा अभ्यास करणे
३. सरदार वल्लभभाई पटेल व संस्थानांचे विलीनीकरण याचा अढावा घेणे.
४. हैदराबाद संस्थानाचे भारतात सामीलीकरण प्रक्रिया जाणून घेणे.
५. वल्लभभाई पटेलाच्या एकत्रीकरणाच्या भुमिकेचा अभ्यास करणे.
६. जूनागढ व जम्मुकाश्मिर विलीनीकरण प्रक्रियेचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :–**

सदर शोध निबंधासाठी विविध साधनांचा अभ्यासाठी वापर केला असून त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, संशोधन पुस्तिका, वर्तमानपत्रे, इंटरनेट यांचा वापर केला आहे.

**संस्थानाचे विलीनीकरण :–**

१५ ऑगस्ट १९४७ भारताला स्वांतत्र मिळाले. परंतु ब्रिटिश भारतातुन जाता–जाता संस्थानात कुटीरतेची बिजे पेरून गेले. विषेश म्हणजे भारताला ब्रिटिशांकडुन स्वांतत्र मिळाले त्यावेळी भारताचा जवळ–जवळ ४० टक्के प्रदेष हा लहान–मोठया संस्थांनानी व्यापलेला होता. ब्रिटीशांच्या संस्थांनाना स्वंतत्र राहण्याच्या सवलतीमुळे जवळ–जवळ सर्वच मोठे संस्थाने स्वंतत्र राहु इच्छित होते. त्यामुळे भारतीय नेत्यासमोरे सर्वात मोठी समस्या निमार्ण झाली ती म्हणजे संस्थानाचे विलीकरणाची भारताला एकसंघ बनविण्यासाठी भारताचे एकत्रित करण घडवून आणण्यासाठी ५६५संस्थानांचे विलीकरणाची प्रक्रिया यशस्वी पणे पुर्ण केली ती म्हणजे सरदार वल्लभ भाई पटेल यांनी नव्याने निमार्ण झालेल्या मंत्रीमंडळात उपपंतप्रधान, गृहखाते तसेच संस्थाना संबधीचे खाते सरदार वल्लभाई पटेलाकडे सोपविण्यात आले होते याचा कारभार हाती घेतल्याने सर्व प्रथम सरदार पटेलांनी व्ही. पी. मेनन यांच्या मदतीने संस्थाने विलीकरणाची सुरूवात केली. संस्थानाचे विलीनीकरण हे संस्थानिकांच्या नाहीतर त्याठिकाणच्या जनतेच्या मतानुसार व्हावे अशी भारताची इच्छा होती. संस्थानचे विलीनीकरण हे केवळ संरक्षण, दळण–वळण, परराष्ट्र या तीन विषयापुरतेच होते. त्यासाठी ९ कलमाचा एक विलीनीकरण जाहीरनामा तयार केला होता. संस्थान खात्याच्या उद्घाटनात सरदार वल्लभभाई पटेलांनी सांगीतले की, केवळ तीनच विषयांच्या बाबतीतील अधिकार केंद्राकडे दया. त्यापेक्षा वेगळे काहिही देवू नका. कारण त्यामुळे संस्थानिकासह भारत एकसंघ बनणार होता.सरदार पटेलाचे खंबिर नेतृत्व मुत्सदीपणा कठोर निर्णय क्षमता या कारणामुळे अनेक संस्थाने भारतात विलीन झाली. ते म्हणजे केवळ वल्लभभाई पटेलांमुळे परंतू संस्थानाच्या विलीनीकरणाला अपवाद ठरली म्हणजे जूनागड संस्थान, हैदराबाद संस्थान व जम्मुकाश्मिर संस्थान.

**जूनागढ संस्थान विलीनीकरण :–**

जूनागड संस्थान गुजरातमधील सौराष्ट्राच्या किना–यावरील एक संस्थान याठिकाणी ८० टक्के जनता ही हिंदु होती. राजा मात्र मुस्लिम होता. त्यामुळे या टिकाणाच्या जनतेला भारतात सामील व्हायचे होते. असे असताना देखील संस्थानच्या नबाबाने १५ ऑगस्ट १९४७ ला हे संस्थान पाकिस्तानात सामील केले. सरदार वल्लभभाई पटेल, नेहरू, इतरही भारतीय पुढा–यांच्या मते व जनतेच्या मताप्रमाणे संस्थाने विलीन व्हावी त्याठिकाणच्या जनतेचा निर्णय हाच अंतिम निर्णय असावा त्यामुळे फेब्रुवारी १९४८ मध्ये जूनागढ संस्थानात विलीनीकरणाच्या प्रश्नावर जेव्हा सार्वमत घेण्यात आले. त्यावेळी त्याठिकाणच्या जनतेने भारतात सामील होण्याची इच्छा दर्शवली त्यामुळे पटेलांना ते संस्थान भारतात दि. २९ जानेवारी १९४९ ला विलीन करून घेतले.

**हैद्राबाद संस्थान विलीकरण :–**

खरे तर हैद्राबाद संस्थान हे भारतातील सर्वात मोठे संस्थान होते. हैद्राबाद राज्याची निर्मिती झाल्यापासुन ते १९४८ पर्यंत टिकवुन असलेल्या या संस्थानाचा राजा मुस्लिम होता. व याठिकाणची जनता ही ८५ टक्के हिंदू होती विशेष म्हणजे हैद्राबाद संस्थानाच्या सर्व बाजूनी भारतीय प्रदेश होता. या ठिकाणी राजा निजाम हा पाकीस्तानच्या मदतीच्या जोरावर स्वता:चे सैन्य वाढवु लागला सुरवातीच्या काळात निजामा संबधी निर्णय घेतांना सरदार पटेलांनी घाई दाखविली नाही परंतु या काळात निजामाने सैन्य वाढविण्यास सुरूवात केली.इत्तीहदउल मुस्लिमीन व रझाकार हे निमलष्करी दल निर्माण केले. रझाकाराचे वाढते प्रभुत्व, वाढते अत्याचार याला आळा घालण्यासाठी व निजामा बरोबरच्या लाबत चाललेल्या वाटाघाटीला कंटाळुन अजारी असताना देखील पटेलानी नेहरूना पत्र लिहुन कळविले कि निजामाला आता परखडपणे सांगण्याची वेळ आली आहे. एवढे असुन देखील

निजाम शस्त्रसामग्री आयातच करत होता. पर्यायाने १३ तारखेला १९४८ ला भारतीय सैन्य हैदराबाद संस्थानात जनरल चौधरीच्या नेतृत्वाखाली घुसले व अवघ्या तीनच दिवसात निजामाने शरणगती पत्करली व नोव्हेंबर ... संस्थान भारतात विलीन झाले.

**जम्मु–काश्मिर संस्थान विलीनीकरण :–**

जम्मु–काश्मिर संस्थान हे भारत–पाकिस्तानच्या सिमेवर होते. येथील राजा हरिसिंग हिंदु होता ... टक्के प्रजा मुस्लिम होती. परंतू शेख अब्दुला हे संस्थान भारतात विलीन करू इच्छित होते. सरदार ... जूनागढ व हैदराबाद सारखाच जनमताचा कौल विचारात घेणार होते. मात्र याच काळात हजारो पठाणी ... काश्मिरात घुसले. राजा हरिसिंगाने भारत सरकारकडे मदत मागितीली पटेलांनी मदत करण्यासाठी विलीनीकरणाची अट घातली. हरिसिंगाणाने विलीनीकरण नाम्यावर सही केली. विलीनीकरण नाम्यावर सही होताच भारतीय सैन्य काश्मिरात दाखल झाले. पाकिस्तानी सैन्याने त्याने मागे ढकलले. परंतू प्रश्न युनोत गेल्याने आज–ता... तसाच राहिला. सरदार वल्लभभाई पटेल, नेहरू, शेख अब्दुला यांच्या विलीनीकरणाच्या आग्रहाने अधिकृतरित्या मात्र काश्मिर संस्थान भारतात विलीन झाले.

**निष्कर्ष :–**

सरदार वल्लभभाई पटेलांच्या कामगिराचा विचार केला तर संस्थानचे विलीनीकरण करून घेणे हो ... महत्वाची जबाबदारी त्यांनी निभावली. कारण भारताला एकसंघ, एकत्रीत त्याबरोबर नंतरच्या काळात परकिय आक्रमनापासून व सततच्या उपद्रवचा त्रास कमी करण्यासाठी, भारताची अखंडता टिकण्यासाठी संस्थानांचे विलीनीकरण होणे महत्वाचे होते. संस्थानाच्या विलीनीकरणात सरदार वल्लभभाई पटेलांनी घेतलेल्या धाडसी निर्णयांचे फळ म्हणजे आपणास आज अखंड भारत देश पहावयास मिळतो. त्यातुन असा निष्कर्ष निघतो ... वल्लभभाई पटेलांच्या याच गुणामुळे त्यांना पोलादी पुरूष म्हटले गेले. भारताला स्वातंत्र मिल्यानंतरची ... समस्या म्हणजे ५६५ संस्थानाचे विलीनीकरण ही सरदार पटेलांनी त्यांच्या संस्थान खात्यांनी, मेनन, नेहरू ... अगदी यशस्वी पणे हाताळली.

**संदर्भग्रंथ :–**

पोलादी राष्ट्पुरूष –अरूण करमाकर
इंडीया आफ्टर इंडीपेंडन्स –मुळलेखक बिपीनचंद्र
आधुनिक भारताचा इतिहास –डॉ.बी.एल ग्रोवर
डॉ.एन.के. बेल्हेकर
लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल –मुळ लेखक बी. कृष्ण मराठी अनु. विलास गिते
आधुनिक भारत –डॉ रा.श्री. मारवंचीकर
वल्लभभाई पटेल चरित्र व काळ –त्र.र.देवगिरीकर
उवकमतद पदकप १८८५.१९४७ . नउपज तांत